**<u>ठळक बातम्या</u>**

- भारतीय अवकाशयात्री ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आज अंतराळ स्थानकातून परतीच्या प्रवासाला निघणार

- छत्रपती शिवाजी महाराजांच्या बारा गडकिल्ल्यांना जागतिक वारसा म्हणून युनेस्कोची मान्यता मिळाल्याबद्दल आज महाराष्ट्र विधानसभेत आनंदोत्सव

- अमेरिका युक्रेनला ‘पॅट्रियट’ हवाई संरक्षण क्षेपणास्त्रं देणार

- अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारताला विजयासाठी १३५ धावांची गरज

**<u>आणि</u>**

- प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेत्री बी. सरोजा यांचं निधन

**<><><><>**

भारतीय अवकाशयात्री ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि ऑक्सिओम-4 मोहिमेतले त्यांचे तीन सहकारी आज अंतराळ स्थानकातून परतीच्या प्रवासाला निघतील. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज दुपारी साडेचार वाजता यानाच्या अनडॉकिंगचं नियोजन करण्यात आलं असून, उद्या मंगळवारी दुपारी तीन वाजता हे अंतराळवीर पृथ्वीवर परत येतील अशी माहिती विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंह यांनी दिली आहे. त्यानंतर पृथ्वीच्या गुरूत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी शुक्ला इतर सहकाऱ्यांसह फ्लाईट सर्जनच्या देखरेखीखाली सात दिवसांच्या पुनर्वसन कार्यक्रमामध्ये सहभागी होतील. या मोहिमेअंतर्गत 14 दिवस शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात मुक्काम केला त्यामध्ये भारतासाठी सात प्रयोग केले. अंतराळ स्थानकातून निघण्यापूर्वी शुक्ला यांनी सांगितलं,

**- - - होल्ड - बाईट- - -**

**- <><><><>**

भारताच्या ऐतिहासिक चांद्रयान ३ मोहिमेला आज दोन वर्षे पूर्ण झाली. या मोहिमेचा उद्देश चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ लँडर आणि रोव्हर उतरवणं तसंच संपूर्ण लँडिंग आणि

रोव्हर प्रकियेचं प्रात्यक्षिक दाखवणं हा होता. इस्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं विकसित केलेल्या LVM3 M4 रॉकेटद्वारे चांद्रयान-३ चं यशस्वीरित्या प्रक्षेपण करण्यात आलं. तर, २३ ऑगस्ट २०२३ रोजी, चांद्रयान-३ चं चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीरित्या सॉफ्ट-लँडिंग झालं. या लँडिंगमुळे चं ंद्रावर यशस्वीरित्या लँडिंग करणारा भारत हा चौथा देश बनला. या मोहिमेदरम्यान, चंद्राच्या पृष्ठभागावरच्या प्लाझ्माचे मोजमाप, खनिज, माती इत्यादींबाबत माहिती घेण्यासाठी अनेक प्रयोग करण्यात आले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी चंद्राच्या पृष्ठभागावर विक्रम लँडर आणि प्रज्ञान रोव्हर ज्या ठिकाणी उतरलं त्या जागेला शिवशक्ती असं नाव दिलं आहे.

**<><><><>**

११ जुलैला संपलेल्या आठवड्यात भारतीय रोखे बाजारात विदेशी गुंतवणूकदारांनी अंदाजे चार हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. एप्रिल, मे आणि जून महिन्यात रोख्यांच्या खरेदीमुळे त्यात भर पडली. अमेरिकेच्या निर्यात शुल्क धोरणामुळे जागतिक बाजारपेठेत अनिश्चिततेचे वातावरण असूनही भारतीय शेअर बाजारात मोठी परकीय गुंतवणूक झाल्याचे दिसून येत आहे.

**<><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या बारा गडकिल्ल्याना जागतिक वारसा म्हणून युनेस्कोची मान्यता मिळाली, याबद्दलचं निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिलं. युनेस्को वारसा यादीत समावेशासाठी भारताकडून ७ प्रस्ताव होते. त्यातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या किल्ल्यांचा हा प्रस्ताव युनेस्कोकडे पाठवायला मंजुरी दिली म्हणून मुख्यमंत्र्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. जागतिक वारसा स्थळांच्या यादीत या किल्ल्यांचा समावेश व्हावा म्हणून प्रयत्न करणाऱ्या सर्वांचं त्यांनी आभार मानले.

CSMT स्थानकाच्या परिसरात शिवाजी महाराजांचा पुतळा उभारावा आणि मुंबई सेंट्रल स्थानकाला नाना शंकरशेट यांचे नाव देण्याची मागणी भास्कर जाधव यांनी केली. CSMT पुनर्विकासात शिवाजी महाराज यांचा पुतळा लावण्यासाठी जागा निश्चित आहे. तसंच मुंबई सेंट्रल स्थानकाला नाना शंकरशेट यांचं नाव देण्याचा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी

रेल्वे मंत्रालयाला पाठवला आहे. त्यावर लवकर निर्णय घ्यावा यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

विधानभवनाच्या परिसरातल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ अभिवादन करुन, आज सर्व आमदारांनी आनंदोत्सव साजरा केला.

<><><><>

नॅशनल हेराल्ड मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि अन्य आरोपींविरोधात सक्तवसुली संचालनालयानं  दाखल केलेल्या पुरवणी आरोपपत्राची दखल घेण्याचा आदेश दिल्लीतील राऊस अव्हेन्यू न्यायालयानं आज राखून ठेवला.  या प्रकरणाची  पुढील सुनावणी २९ जुलैला होईल, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं.

नॅशनल हेराल्ड प्रकरणी ईडीनं सादर केलेल्या पुरवणी आरोपपत्रात काँग्रेस नेत्यांविरुद्ध मनी लाँड्रिंगचे आरोप झाले आहेत. या पुरवणी आरोपपत्रातले सर्व आरोप काँग्रेस नेत्यांनी फेटाळून लावले असून, या याचिकेची दखल घेण्यास विरोध केला आहे. नॅशनल हेरॉल्डची प्रकाशन संस्था असलेल्या असोसिएडेट जर्नल्स लिमिटेड कंपनीच्या मालमत्तेचा गैरवापर करत दोन हजार कोटी रुपयांचा आर्थिक घोटाळा केला आहे. तसंच नॅशनल हेरॉल्डची मालमत्ता यंग इंडियन या कंपनीनं फसवणूक करून ताब्यात घेतली. यंग इंडिया कंपनीत सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांचा प्रमुख हिस्सा असल्याचा आरोप ईडीनं केला आहे.

<><><><>

शस्त्रास्त्रांचा व्यापारी संजय भंडारी याच्याशी संबंधित मनी लाँडरिंग प्रकरणात सध्या सक्तवसुली संचालनालय रॉबर्ट वड्रांची चौकशी करत आहे. काँग्रेस नेता प्रियंका गांधी यांचे पती रॉबर्ट वड्रा आज त्याकरता नवी दिल्लीच्या ईडी कार्यालयात हजर आहेत. गुरुग्राम इथल्या एका भूखंड खरेदी प्रकरणातही यापूर्वी ईडीने वड्रांची चौकशी केली होती.

<><><><>

अमेरिका लवकरच युक्रेनला 'पॅट्रियट' हवाई संरक्षण क्षेपणास्त्रं देणार असल्याची माहिती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली. युक्रेनवर रशियाकडून सातत्यानं हवाई हल्ले होत आहेत. युक्रेनला हवाई संरक्षणाची अत्यंत गरज असून त्या हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी ही क्षेपणास्त्र  दिली जात असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प

यांनी सांगितलं. मात्र, किती क्षेपणास्त्र युक्रेनला देणार हे अद्याप ठरलं नसल्याचं ट्रम्प यांनी सांगितलं. या क्षेपणास्त्रांचा खर्च युरोपियन युनियन करणार आहे.

<><><><>

जम्मू काश्मिरमध्ये अमरनाथ यात्रेकरूंचा आणखी एक जथा आज सकाळी जम्मूहून रवाना झाला. भगवती नगर यात्री निवासातून काश्मिरसाठी निघालेल्या या जथ्थ्यात ६ हजार १४३ यात्रेकरू आहेत. १०० वाहनांचा पहिला ताफा २ हजार २१५ यात्रेकरूंना घेऊन बालतालकडे जाण्यासाठी तर १३५ वाहनांचा दुसरा ताफा ३ हजार ९२८ यात्रेकरूंना घेऊन पहलगाम कडे जाण्यासाठी निघाला. अमरनाथ यात्रेदरम्यान आतापर्यंत दोन लाखांहून अधिक यात्रेकरूंनी अमरनाथ गुंफेपर्यंत पोहचून दर्शन घेतलं आहे.

<><><><>

कैलास मानसरोवर यात्रेकरुंची सहावी तुकडी आज संध्याकाळी नाथुला मार्गे सिक्कीमला पोहोचेल. यामध्ये ४५ यात्रेकरू, आणि संपर्क अधिकाऱ्यांसह एकूण ५२ जण आहेत. याशिवाय, गंगटोकमध्ये चार सहाय्यक कर्मचारी आधीच तैनात आहेत. हा जथ्था आज दुपारी साडेबाराच्या सुमाराला बागडोगराला पोहोचेल.

<><><><>

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारताला विजयासाठी १३५ धावांची गरज आहे. लॉर्ड्स मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात इंग्लडचा दुसरा डाव १९२ धावांवर संपला. दिवस अखेर भारताच्या दुसऱ्या डावात ४ बाद ५८ धावा झाल्या होत्या. रात्रीचा रखवालदार म्हणून आलेल्या आकाशदीपला इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स ने दिवसातल्या शेवटच्या चेंडूवर तंबूत परत पाठवलं. पहिल्या डावात शतक झळकावणारा के एल राहुल ३३ धावांवर खेळत आहे. आज सामन्याचा अखेरचा दिवस आहे. मालिकेत दोन्ही संघांनी आतापर्यंत प्रत्येकी एक सामना जिंकला आहे.

<><><><>

बिश्केक इथं झालेल्या जागतिक कनिष्ठ गट कुस्ती स्पर्धेत भारताच्या फ्रीस्टाईल संघाने उपविजेतेपद मिळवलं. भारतीय कुस्तीगीरांनी २ सुवर्ण, एक रौप्य आणि ५ कांस्यपदकं मिळवत १५७ गुणांची कमाई केली.

सर्व प्रकारांमधे मिळून भारताला १० सुवर्ण, ३ रौप्य आणि ८ कांस्यपदकं मिळाली.

**<><><><>**

यंदाची विम्बल्डन टेनिस स्पर्धा जेन्निक सिन्नरने जिंकली.  तीन तास चार मिनिटे सुरू असलेल्या थरारक अंतिम सामन्यात सिन्नरने गतविजेत्या कार्लोस अल्कराझचा 4-6, 6-4, 6-4, 6-4 असा पराभव केला. विम्बल्डन स्पर्धेच्या 148 वर्षांच्या इतिहासात विजेतेपद पटकावणारा सिन्नर पहिलाच इटालियन खेळाडू आहे.

**<><><><>**

दाक्षिणात्य चित्रपट अभिनेत्री बी सरोजा यांचं आज बंगळुरुमध्ये निधन झालं. त्या ८७ वर्षांच्या होत्या. अभिनय सरस्वती म्हणून प्रसिद्ध असलेल्या  सरोजा यांनी १९५५ मध्ये महाकवी कालिदास चित्रपटाद्वारे रुपेरी पडद्यावर पदार्पण केलं. सात दशकांहून अधिक काळ त्यांनी कन्नड, तमिळ, तेलगू आणि हिंदी भाषेतल्या २०० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केलं. ब्रिटिशांशी लढणाऱ्या कित्तूरच्या शूर राणी चेन्नम्माची भूमिका साकारून त्यांनी कन्नड चित्रपट रसिकांची मने जिंकली. भारतीय चित्रपटसृष्टीतील त्यांच्या मौल्यवान योगदानाबद्दल सरोजा देवी यांना पद्मश्री आणि पद्मभूषण पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं. दिग्गज अभिनेते डॉ. राजकुमार आणि कल्याण कुमार यांच्यासोबत त्यांनी काम केलं आहे. त्यांनी राजेंद्र कुमार आणि शम्मी कपूर यांच्यासोबत आशा, घराना आणि मेहेंदी लगा के रखना या हिंदी चित्रपटांमध्ये उल्लेखनीय भूमिका केल्या आहेत.

**<><><><>**

राजस्थान, पश्चिम बंगाल, गुजरात, झारखंड, ओदिशा आणि मध्य प्रदेशाच्या पश्चिम भागात आज अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. दिल्लीचा काही भाग,चंदीगड, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मिर, कर्नाटकचा समुद्रकिनारी भाग, अंदमान-निकोबार द्वीपसमूह आणि पूर्वेकडील राज्यांत पुढील दोन ते तीन दिवस  मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मध्य प्रदेशाच्या काही भागात, बिहार, झारखंड, ओदिशा, सिक्कीम, तेलंगणा, उत्तराखंड आणि राजस्थानच्या पश्चिमकेडील भागात आज मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस तसंच वादळी वारे वाहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तर आंध्र प्रदेश, तामिळ नाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल इथं वातावरण उष्ण आणि दमट राहण्याची शक्यता आहे.

**//<><><><>//**